नगरपरिषद अध्यक्ष पदाच्या थेट
निवडणूकांसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा
वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक-jरानिआ/नप-२०१६ /प्र.क्र.३८/का-६,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४००० ०३२.
दिनांक : १४ ऑक्टोबर,२०१६

**आदेश**

क्रमांक-रानिआ/नपा/२०१६/प्र.क्र. /का-०६.- ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे ) अध्यादेश सन २०१६ अन्वये नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाकरिता थेट निवडणूक घेण्याची तरतूद केली आहे.

आणि ज्याअर्थी या सुधारणा नुसार महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ ( १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -४०) चे कलम ५५ अ-१ अ च्या पोटकलम ३ नुसार अध्यक्षाची निवडणूक परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबर एकाच वेळी घेण्यात येईल आणि नगरपरिषदेच्या निवडणुका घेण्यासंदर्भातील कार्यपध्दती अशा निवडणुकीस,योग्य त्या फेरफेरांसह, लागू होईल अशी तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा ( अध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक )नियम २०१६ च्या नियम ७३ नुसार या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही , राज्य निवडणूक आयोग ,महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ यांशी सुसंगत असतील असे नगरपरिषदांच्या अध्यक्ष पदांच्या थेट निवडणूक घेण्याबाबतीत स्वतंत्रपणे निर्देश देऊ शकतील.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा ४०) च्या कलम १३ मधील तरतुदीनूसार निवडणुकीमध्ये मतदान मतपत्रिकेद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे करता येईल, तसेच प्रतिनिधीद्वारे मत देता येणार नाही अशी तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा ( अध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक )नियम २०१६ च्या नियम ४१ नुसार इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची कार्यपध्दती राज्य निवडणूक आयोगाने विहित केल्याप्रमाणे असेल अशी तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, नगरपरिषदेच्या अध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक घेण्याकरिता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची सविस्तर कार्यपध्दती विहित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १० अे (४) अन्वये तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे, **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेश, २००४**", क्रमांक - एसईसी/जीईएन२००४/प्र.क्र.२/का.६,दिनांक - १३ एप्रिल, २००४. आदेश योग्य त्या फेरफारासह नगरपरिषद अध्यक्ष पदाच्या थेट निवडणूकांसाठी लागू राहतील.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(शेखर चन्ने)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र